

हमें नई-नई चुनौतियों को स्वीकार करना चाहिए। सफलता मिलेगी या अनुभव मिलेगा। अच्छे जीवन के लिए ये दोनों ही जरूरी हैं।

dainiklokaarambh@gmail.com

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार २४ जानेवारी २०२५ | अंक४६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



**प्रतिनिधी नेमणे आहे.**

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# गेल्या वर्षी सोन्यासारखा भाव आता जुन्नरच्या टोमॅटोला कोणी विचारेना

## ५ रुपये किलोचा भाव

मात्र यंदा टोमॅंटोला ५ ते १० रुपये प्रतिकिलो बाजार मिळत असल्याने शेतक-्यांच्या डोळ्यात पाणी आणले आहे. टोमॅंटोचे दर अचानक कोसळल्याने उत्पादन खर्च सोडाच वाहतूक खर्चही मिळत नसल्याने शेतक-यांच्या मेहनतीचा चिखल होत आहे. गेल्या वर्षीप्रमाणेच चांगला बाजारभाव मिळेल या अपेक्षेने अनेक शेतक-यांनी मोठ्या प्रमाणावर टोमॅटोचे पीक घेतले. पण आता दर कोसळल्याने त्यांच्यासमोर संकट उभं ठाकलं आहे.




गेल्या वर्षी कांद्यापेक्षा टोमॅटो भाव खाऊन गेला होता. यामध्ये राज्यातील जुन्नर तालुक्यातील शेतर्कयांना टोमॅटोचा सोन्यासारखा भाव मिळाला होता. अनेक शेतर्कयांनी लाखो रुपये कमावले होते. पण यंदा टोमॅटोला कवडीमोल भाव मिळाल्याने शेतकरी चिंतेत सापडला आहे. दुसरीकडे अनेक जिल्ह्यांतील कापसाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी चिंतेत आहे. चांगला भाव मिळण्याच्या अपेक्षेने कापसाला घरात ठेवले आहे. हा कापूस आता काळवंडत असल्याने शेतक-यांच्या जीवाला घोर लागला आहे. शेतक-्यांनी सरकारला योग्य मदत करण्याची मागणी केली आहे. जुन्नरचा टोमॅटो मातीमोलजुन्नरच्या नारायणगाव बाजार समितीत टोमॅंटोलाला कवडीमोल बाजारभाव मिळत असल्याने शेतर्कयांच्या मेहनतीचा चिखल झाला आहे. उत्तर भारतात सर्वाधिक निर्यात होणा-या टोमॅंटोचे सर्वाधिक उत्पादन जुन्नर ,आंबेगाव ,शिरुर आणि खेड तालुक्यात होत आहे. गेल्या वर्षी टोमॅंटोने शेतर्कयांना चांगली कमाई करुन दिली होती.

अतिवृष्टीचे अनुदान मिळाले धाराशिव जिल्हा प्रशासनाच्या अहवालानंतर २०२४ च्या पहील्या टप्प्यातील अतिवृष्टी अनुदान जिल्ह्यातील १ लाख ८० हजार शेतर्कयांना मंजूर झाले होते. त्यासाठी २२१ कोटी ८१ लाख रुपये निधीची गरज होती.

# दरवाढीच्या प्रतिक्षेत कापूस घरातच काळवंडला

## हमी भावापेक्षा ४०० ते ५०० रुपये कमी दराने

जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यात अनेक शेतर्कयांनी मकर संक्रांतीनंतर भाव वाढेल या आशेपोटी हजारो क्विंटल कापूस घरातच साठवून ठेवला. मात्र या शेतर्कयांना हमी भावापेक्षा ४०० ते ५०० रुपये कमी दराने खाजगी व्यार्पायांना हा कापूस विकावा लागत आहे. कमी भावामुळे कापूस उत्पादक शेतकरी चिंतेत सापडले आहेत. सीसीआय खरेदी केंद्रावरील कापूस खरेदी अतिशय धिम्या गतीने असल्यामुळे शेतकरी खाजगी व्यार्पायांना कापूस विकत आहे. दरम्यान अनेक दिवसापासून साठवून ठेवलेल्या कापसामुळे अंगाला खाज सुटत आहे. शिवाय कापूस ही काळा पडत असल्याने मिळेल त्या भावात त्याची विक्री करण्यात येत आहे.

# रेखाकला परीक्षेत कोळेश्वर विद्यालयाचे यश

गेवराई : प्रतिनिधी महाराष्ट्र शासन कला संचालनालय मुंबई मार्फत सप्टेंबर २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या शासकिय रेखाकला परीक्षा एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड चित्रकला परीक्षेमध्ये गेवराई तालुक्यातील कोळगांव येथील नूतन कोळेश्वर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रतिवर्षी प्रमाणे आपली यशाची परंपरा कायम राखली.

शासकिय रेखाकला परीक्षेस विद्यालयातून एकुण ३८ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी द्वितीय श्रेणी मध्ये २२ व तृतिय श्रेणीमध्ये १६ विद्यार्थी उत्तीर्ण होवून विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे कला शिक्षक निकम किशोर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सर्व विद्यार्थ्यांचे संस्था सचिव नावंदे एम. एम., शाळेचे मुख्याध्यापक बागलाने आर. व्ही. व सर्व शिक्षक वृंदानी अभिनंदन केले. तसेच या विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# पिठ्ठी ग्रामपंचायत व वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्टच्या माध्यमातून मकरसंक्रांतीनिमित्त हळदीकुंकू कार्यक्रम

## महिलांनी रोजगार कसा भेटला पाहिजे व महिला उद्योजक कसे झाले झाले पाहिजे यावर सरपंच व वॉटर शर्ट च्या माध्यमातून त्यांना मार्गदर्शन देण्यात आले

पाटोदा प्रतिनिधी :- पिठ्ठी ग्रामपंचायत माध्यमातून मकर संक्रात निमित्त कार्यक्रम घेण्यात आला. व महिलांनी रोजगार कसा भेटला पाहिजे व महिला उद्योजक कसे झाले झाले पाहिजे यावर सरपंच व वॉटर शर्ट च्या माध्यमातून त्यांना मार्गदर्शन देण्यात आले आँर्गनायझेशन ट्रस्टच्या माध्यमातून चालु आसलेल्या उपक्रमाची माहिती देऊन गटक्षमता बांधनी प्रशिक्षण देन्यात आले यावेळी सरपंच मंगल ताई कवठेकर . उपसरपंच, सर्व सदस्य, डॉक्टर प्रभाकर कवठेकर सि आर पी ताई,सर्व अध्यक्ष सचिव सदस्य तसेच वाँटरशेड टिम मेंबर श्री अनिल पालवे सर,श्री भरत कवठेकर उपस्थित होते.. .!



# रासेयो विभागाचे वार्षिक विशेष युवक शिबीर

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाटकिनवट : बळीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे वार्षिक विशेष युवक शिबिर दत्ता गाव भिला नाईक तांडा येथे दि.२४ जानेवारी ते ३०-जानेवारी दरम्यान ङ्गयुथ फॉर माय भारत व युथ फॉर डिजिटल लिटरसीङ्क या संकल्पनेवर आधारित संपन्न होणार आहे.

मनुष्यबळ मंत्रालय ( नवी दिल्ली )तंत्र शिक्षण मंत्रालय (महाराष्ट्र राज्य) आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चे राष्ट्रीय सेवा योजना विभागव महाविद्यालयाद्वारे आयोजित युथ फॉर माय भारत व युथ फॉर डिजिटल लिटरसी या संकल्पनेला पुढे नेण्यासाठी अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम या शिबिरात राबविण्यात येणार आहेत शिबिराचे उद्घाटन दि. २५-जानेवारी रोजी संपन्न होणार आहे शिबिराचे उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात चे राष्ट्रीय विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांच्या हस्ते होणारा असून अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. के. बेंबरेकर हे राहणार आहेत. शिबिरासाठी नवीन शैक्षणिक धोरण, बालविवाह जनजागृती, मतदान जनजागृती, अंधश्रद्धा निर्मुलन, वाचक -लेखक संवाद, ग्रंथ दिंडी, डिजिटलायझेशन व युवक, या विभिन्न विषयावर तज्ञ मार्गदर्शक प्राध्यापकाचे व्याख्यान व समाज जनजागृती करण्यासाठी केशव हरी केंद्रे व हिरामण महाराज यांचे समाज कार्यक्रम संपन्न होणार आहेत. डिजिटल सहेली, बचत गट डिजिटलायझेशन, व डिजिटलाजेशन व सायबर , कॅशलेस व्यवहार व युवक, जल व्यवस्थापन व युवक , प्लास्टिक मुक्त भारत व युवक, अशा विभिन्न विषयावर जनजागृती अभियान शिबिरात संपन्न होणार आहे.शिबिराची तयारी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.शेषराव माने प्रा. ज्ञानेश्वर चाटे महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. शुभांगी दिवे डॉ. रत्ना कोमावार मेहनत घेत आहेत.

# महात्मा फुले विद्यालयात शालेय स्तरीय विज्ञान प्रदर्शन संपन्न

घनसावंगी तालुक्यातील पानेवाडी येथील महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्धाटन संस्थेचे संस्थापक सचिव श्री आत्मारामजी अण्णा तिडके साहेब यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक श्री अमोल भैया तिडके सर, पर्यवेक्षक श्री गोसावी सर यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेतील वर्ग ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांपैकी ६५ विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट प्रयोगाची मांडणी केली. या प्रदर्शनास जि. प. प्राथमिक शाळा पानेवाडी येथील शिक्षक व विद्यार्थ्यांनी भेट देऊन प्रयोगाची माहिती जाणून घेतली. या कार्यक्रमास शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, गावातील नागरिक, महिलावर्ग व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे



सूत्रसंचलन श्री कारेगावकर सर यांनी केले. कार्यक्रमाचे परीक्षक म्हणून श्री भालेकर सर व श्री शेख सर यांनी काम पाहिले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शाळेतील शिक्षक श्री चौधरी सर, श्री मस्के सर, श्री झोरे सर, श्री बेग सर, श्री गोरे सर यांनी परिश्रम घेतले.

# बोगस मुन्नाभाई डॉक्टरांचा धारूर तालुक्यातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळ

## तालुका आरोग्य अधिकारी निवासी न राहता बाहेरगावावरून करतात प्रवास

### तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील अनेक अधिकारी सतत गैरहजर तर अनेक दुपार नंतर गैरहजर

**प्राथमिक आरोग्य,उप आरोग्य केंद्रावरील डॉक्टर निवासी राहत नसल्याने रुग्णांची हेळसांड त्यांनी मुख्यमंत्र्यांची भेट का घेतली हे माहिती नाही,**

किल्ले धारूर तालुक्यातील अनेक गावांमध्ये परप्रांतीय बोगस बंगाली मुन्नाभाई डॉक्टरांनी नागरिकांच्या आरोग्याशी खेळ मांडला असून तालुका आरोग्य अधिकारी या प्रकाराकडे गेल्या अनेक दिवसापासुन दुर्लक्ष करताना दिसून येतात त्याचप्रमाणे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शहाजी लोमटे हे धारूर येथे निवासी राहत नसून अंबाजोगाई येथून ये जा करतात यामुळे तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील इतरही कर्मचारी भरपूर प्रमाणात सतत गैरहजर असतात अनेक कर्मचारी हे दुपारच्या वेळेनंतरही दांडी मारताना दिसून येतात याकडे जिल्हा परिषद आरोग्य विभागाने लक्ष देण्याची मागणी नागरिक करत आहेत.

धारूर तालुक्यातील तेलगाव आंबेवडगाव हिंगणी परिसरात अश्या विविध ठिकाणी अनेक गावात परप्रांतीय बोगस डॉक्टरांनी आपले दुकान मांडून नागरिकांच्या आरोग्याची खेळ चालवला आहे आपल्याकडे डॉंक्टरकीची डिग्री नसतांना ऊपचार केले जात आहेत यामुळे या बनावट व बोगस डॉक्टरकडून अनेकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत असून अनेकांचे जीवन धोक्यात असून याकडे तालुका आरोग्य अधिकारी मूग गिळून गप्प आहेत त्याचप्रमाणे तालुक्यातील उप आरोग्य केंद्र हे वेळोवेळी बंद असतात तर प्राथमिक आरोग्य केंद्र येथील डॉक्टर्स हे निवासी राहत नाहीत आपाल्या गावावरून आपल्या मनमानी वेळेप्रमाने ये जा करतात धारूर तालुक्यातील आरोग्य विभागाची यंत्रणा याकडे दुर्लक्ष करताना दिसून येते धारूर येथील तालुका

**तालुका अरोग्य अधिकारी डॉं.शहाजी लोमटे यांना प्रतिक्रिया संदर्भात फोन केला असता घेतला नाही.**

आरोग्य अधिकारी कार्यालय येथे शासनाच्या वतीने सीसीटीव्ही कॅमेरा बसवण्यात आलेले असून येथील सर्व प्रकार वरिष्ठांनी या सीसीटीव्ही मध्ये चेक केल्यास अधिका-यांचा निष्काळजीपणा दिसून येईल या कार्यालयामध्ये अनेक कर्मचारी सतत गैरहजर असून तालुक्यातील नागरिकांच्या विविध प्रश्नाकडे दुर्लक्ष करतांना दिसून येतात तर दुपारनंतर तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील अनेक कर्मचारी दांडी मारताना पाहायला मिळतात याकडे बीड जिल्हा परिषद आरोग्य विभाग वरिष्ठ अधिका-यांनी लक्ष देण्याची मागणी धारूर तालुक्यातील नागरिकांतून केली जात आहे.

# संपादकीय

## कलेचा, छंदांचा मार्ग

आजच्या आपल्या आयुष्यात आनंद हवा असेल तर त्यासाठी पहिली अट अशी, की निसर्ग नियमानुसार आधी आपण कोणत्या तरी माध्यमातून इतरांना आनंद द्यायला हवा. तो तसा दिला की मग तो आपल्याला दुपटीने परत मिळेल. असा अनुभव आपण सारेच अगदी सहज घेऊ शकतो. माणसाच्या आयुष्यात कलेचे स्थान खूप मोलाचे आहे. सोबतच विविध छंदांचेही आयुष्यात महत्त्व आहे. कलेमध्ये आनंद निर्माण करण्याची व तो इतरांना देण्याची अशी फार विलक्षण शक्ती आहे. कला कुठल्याही प्रकारची असो, ती आनंददायी असते. महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व अशी सार्थ ओळख असलेले प्रख्यात लेखक पु. ल. देशपांडे म्हणतात की, ङ्गसाहित्य- संगीत-नाट्य-नृत्य-खेळ या पैकी एखादी कला जोपासा. कारण पोटापाण्याचा उद्योग तुम्हाला नक्की जगवेल, पण एखाद्या कलेशी जमवलेली मैत्री तुम्ही का जगायचे हे सांगून जाईल.फ ङ्गसंगीत कट्यार काळजात घुसलीफ या नाटकातील एक वाक्य असे की, ङ्गविद्या ही माणसाला बाहेरून ग्रहण करावी लागते, तर कला ही उपजतच आतून बाहेर येते.फ रोजच्या आपल्या आयुष्यात आनंद हवा असेल तर त्यासाठी पहिली अट अशी, की निसर्ग नियमानुसार आधी आपण कोणत्या तरी माध्यमातून इतरांना आनंद द्यायला हवा. तो तसा दिला की मग तो आपल्याला दुपटीने परत मिळेल. असा अनुभव आपण सारेच अगदी सहज घेऊ शकतो. आपण आपल्या आवडत्या शिकलेल्या कलेच्या माध्यमातून स्वतः सहज आनंद घेऊ शकतो व इतरांना सहज देऊही शकतो. इतकेच नव्हे तर, त्या कलेमध्ये पारंगत होऊन कलाकार त्याचा जीवन चारितार्थही चालवू शकतो. विविध प्रकारच्या शिवणकला, नानाविध पाककला, साहित्य, वेगवेगळ्या संकल्पनांतून साकारलेली चित्रकला, रांगोळीकला, शिल्पकला, वास्तुकला, विद्यादान म्हणजेच इतरांना शिक्षित करण्याची कला, नाट्य-चित्रपटाद्वारे अभिनय कला, गानकलांमधील विविध प्रकार, विविध वाद्यांचे वादन, वेगवेगळ्या प्रकारची नृत्ये अशा असंख्य कलांच्या माध्यमातून कलावंत स्वतः आनंद घेत असतात. हे कलावंत समाजालाही आनंद देतात. कोणी वेगवेगळ्या विषयाची मासिके- पुस्तके-कथा-कादंबऱ्या यात लिहीत असते. कोणी कविता करते. कुणी संभाषण कलेद्वारे कार्यक्रमात निवेदक किंवा सूत्रसंचालक बनून प्रेक्षक आणि कलाकार यांच्यातला दुवा होते व कार्यक्रम अधिक खुलवते. यातही एक वेगळा आनंद अशा व्यक्तीस मिळतो. कुणाला पाककलेची आवड असते. अशा व्यक्ती ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणे वेगवेगळे खाद्यपदार्थ करून खाण्यात-खिलवण्यात आनंद मिळवतात. कलेसोबतच छंदही तितकेच महत्त्वाचे. निरनिराळ्या देशांची नाणी, टपालतिकिटे जमवणे, तिकिटे जमवणे, स्वतःच्या आवडीप्रमाणे उद्यान फुलवणे, विविध भाज्यांचा बाग तयार करणे या छंदांमध्ये अनेक जण विपुल आनंद मिळवतात. कुणी निसर्गाच्या सान्निध्यात गड, किल्ले, पर्वत चढाई करण्यात, अभयारण्यांमध्ये वेगवेगळे पक्षी-प्राणी-झाडे-फुले यांचा अभ्यास करण्यात, त्याची छायाचित्रे काढण्यात, त्या छायाचित्रांची प्रदर्शने आयोजित करण्यातून आनंद मिळवतात. कुणाचे छंद, आवडी आणखी वेगळ्या प्रकारच्या असतात. आपल्या घराभोवतीचा परिसर स्वच्छ राखणे, लोकसेवा करणे यात काहींचा आनंद सामावलेला असतो. कुणी गाणी गुणगुणण्यात, गाणी म्हणण्यात रमतात, कुणी मनःपूर्वक गाणी ऐकण्यात रमतात. त्यात त्यांना मिळणारा आनंद कशाचीही बरोबरी करू शकत नाही. कुणाला अध्यात्मात गोडी असते, कुणाला सत्संगाची आवड असते. आध्यात्मिक ग्रंथ, पुस्तके, रचना यांचे वाचन-पठण यांत अशा लोकांना मनःपूत आनंद मिळतो. त्याची प्रत काही वेगळीच असते. मनुष्य हा समाजप्रिय आहे. कलेतून निर्माण झालेला आनंद हा स्वतः उपभोगून समाजाला देतो. तर काही जण स्वतः पुरताच किंवा आपल्या कुटुंबापुरताच मर्यादित ठेवतात. खरे तर आता आपल्याला मिळणारा आनंद इतरांसोबत वाटणे सोपे झाले आहे. सोशल मीडियातून हा आनंद सहज अनेकांपर्यंत पोहोचवता येऊ शकतो. आणि, शेवटी जीवन जगणे हीदेखील एक कलाच आहे. त्या कलेतूनही आनंद प्राप्त होत असतो आणि त्या आनंदासोबत समृद्धीही ओंजळीत पडते.

# महाराष्ट्राची लालपरी खरंच स्मार्ट होणार?

ठाण्यातील एसटी बस डेपोंना तातडीने भेटी देत त्यांनी तेथील यंत्रणांना बेशिस्तपणा न खपवून घेण्याबाबत चांगलीच समज दिली. आणि त्याचबरोबर आर्थिक तोट्याच्या दुष्टचक्रात अडकून पडलेल्या एसटी महामंडळाला पुन्हा उभारी आणण्यासाठी तसेच एसटी महामंडळाकरिता नवनवीन आर्थिक स्त्रोत कसे विकसित करता येतील याकरता प्रताप सरनाईक यांनी जोमाने काम सुरू केले.- सुनील जावडेकर हल्लीच्या प्रचंड धावपळीच्या आणि अत्यंत गतिमान काळात असे दुर्मीळ मध्यमवर्गीय अथवा निम्नमध्यम वर्गीय कुटुंब असावे की ज्यांच्याकडे दुचाकी अथवा चारचाकी गाडी घरासमोर नाही. काही वर्षांपूर्वी चारचाकी गाडी ही चैनीची वस्तू म्हणून मध्यमवर्गीय त्याकडे पाहायचे; परंतु काळाच्या ओघात आणि गतीच्या स्पर्धेत परंपरागत सर्व समज मागे पडले आणि कुटुंबामध्ये चारचाकी असणे हे गरजेचे लक्षण बनले आणि ज्या कुटुंबाकडे चारचाकी घेण्याची आर्थिक क्षमता नाही त्यांच्याकडे किमान दुचाकी तरी असतेच असते. गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय समाजाच्या जीवनशैलीमध्ये जो काही एक आमुलाग्र बदल झाला त्यामध्ये चारचाकी आणि दुचाकी वाहनांची निर्माण झालेली अथवा करण्यात आलेली गरज हा एक मोठा बदल म्हणावा लागेल. मात्र असे असले तरी देखील आजही गावोगावी खेडोपाडी अगदी दुरगामी वाड्या, वस्त्यांवर पाड्यांवर केवळ पाच ते दहा रुपयाच्या नाममात्र शुल्कामध्ये हमखास नेऊन सोडणारी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाची बस सेवा ही तळागाळातील गोरगरीब जनतेसाठी आजही त्याच्या दैनंदिन गरजा भागवण्यामध्ये आणि दैनंदिन व्यवहारामध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. ज्याप्रमाणे मुंबईची उपनगरीय रेल्वे सेवा ही रक्तवाहिनी म्हणून ओळखली जाते त्याचप्रमाणे एसटी बस ही ग्रामीण महाराष्ट्राची आणि त्यातही अत्यंत गोरगरीब जनतेची खऱ्या अर्थाने रक्तवाहिनी म्हणूनच काम करत आहे. अर्थात कोणत्याही देशाची अथवा राज्याची सार्वजनिक वाहतूक यंत्रणा ही आर्थिकदृष्ट्या फायद्यामध्ये कधीच नसते त्यामुळे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ हे गेली वर्षानुवर्षे तोट्याची कोटींच्या कोटी उड्डाणे घेत आहे. सरकार येतात आणि जातातही. मात्र गोरगरिबांना अत्यंत अल्पशा भाड्यामध्ये त्यांच्या घराजवळ हक्काने नेऊन सोडणारी एसटी ही मात्र गेली वर्षानुवर्षे दारिद्र्यात आणि तोट्याच्या दुष्टचक्रात अडकून पडलेली आहे. त्यात प्रामुख्याने सत्तेवर असलेल्या राजकीय पक्षांची एसटी महामंडळाकडे पाहण्याची दृष्टी, खासगी वाहनांचा वाढलेला अतिरेकी आणि बेसुमार वापर, अवैध प्रवासी वाहतुकीला मिळणारे पाठबळ आणि त्याचबरोबर उपद्रवी घटकांचा एसटीचे लचके तोडण्याचा सातत्याने सुरू असलेला प्रयत्न हे जे लक्षात घेतले तर केवळ आणि केवळ प्रामाणिक आणि कष्टकरी राज्य परिवहन मंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या पाठबळावरच महाराष्ट्राची ही जीवन वाहिनी एवढ्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये देखील स्वतःचे अस्तित्व राखून आहे असेच म्हणावे लागेल. मग पगाराची कोणतीही हमी ना भविष्य निर्वाह निधीची कोणतीही शाश्वती मात्र असे असले तरी देखील ज्या निष्ठेने आणि ज्या तळमळीने एसटी महामंडळाचे कर्मचारी केवळ सर्वसामान्य गोरगरीब प्रवाशांच्या करिता हा उपक्रम जिवंत ठेवत आहेत हे खरोखरच अत्यंत धाडसाचे आणि कौतुकास्पद म्हणावे लागेल. मध्यंतरी माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने महाराष्ट्रातील महिलांसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या बस सेवेत ५० टक्के बस भाड्यामध्ये सवलत देण्याचा निर्णय घेतला. आणि त्याचा एक मोठा परिणाम जो परिवहन महामंडळाच्या आर्थिक स्थितीवर दिसून आला. तो म्हणजे महामंडळाच्या उत्पन्नात या निर्णयामुळे घसघशीत वाढ झाली. यामुळे कर्मचाऱ्यांना किमान महिनाभराचे वेतन तरी दोन-चार दिवस मागेपुढे का होईना परंतु मिळू लागले. अन्यथा दोन-दोन, चार-चार महिने एसटी कर्मचाऱ्यांना वेतन मिळतानाही मारामारी होती आणि त्यासाठी देखील अखेरीस महामंडळाला राज्य सरकार पुढे हात पसरावे लागत होते. अर्थात आता राज्यामध्ये भाजप शिवसेना अजित पवार यांचे राष्ट्रवादी अशा भरभक्कम महायुतीचे बाहुबली बहुमताचे सक्षम महायुती सरकार सत्तेवर आहे आणि परिवहन मंत्रालयाची जबाबदारी तरुण आणि कार्यक्षमतेची चुणूक दाखवणारे नेते म्हणून समजले जाणाऱ्या प्रताप सरनाईक यांच्यासारख्या उमद्या तडफदार मंत्र्याकडे परिवहन मंत्रालयाची जबाबदारी आहे. परिवहन खात्याचा कारभार हाती घेतल्यानंतर तातडीने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ठाणे मीरा-भाईंदर या त्यांच्या स्वतःच्या कार्यक्षेत्रापासूनच कामाचा श्री गणेशा सुरू केला. ठाण्यातील एसटी बस डेपोंना तातडीने भेटी देत त्यांनी तेथील यंत्रणांना बेशिस्तपणा न खपवून घेण्याबाबत चांगलीच समज दिली. आणि त्याचबरोबर आर्थिक तोट्याच्या दुष्टचक्रात अडकून पडलेल्या एसटी महामंडळाला पुन्हा उभारी आणण्यासाठी तसेच एसटी महामंडळाकरिता नवनवीन आर्थिक स्त्रोत कसे विकसित करता येतील याकरता प्रताप सरनाईक यांनी जोमाने काम सुरू केले. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडे सर्वात मोठी जमेची बाजू जर कोणती असेल तर ते म्हणजे महामंडळाचे प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी अथवा मोठ्या शहरांमध्ये देखील मोक्याच्या ठिकाणी असलेले स्वतःच्या जागेतील एसटीचे डेपो आणि तेथील जागा आहे. या आधीच्या परिवहन मंत्र्यांनी देखील एसटीच्या डेपोंचा बीओटी तत्त्वावर खासगी करण्याच्या माध्यमातून विकास करण्याचा प्रयत्न केला तथापि त्याला होणारा विरोध आणि विरोधातून होणारी शेवटी कोर्टबाजी यात एसटी डेपोंचा विकास हा शेवटी अडकून पडला. परिवहन मंत्री झाल्यानंतर प्रताप सरनाईक यांनी सर्वप्रथम मीरा-भाईंदर येथील एसटी महामंडळाची जागा मीरा-भाईंदर महापालिकेला विकसित करण्यासाठी दिली आणि त्यामुळे आता मीरा-भाईंदरमधील एसटीच्या या जागेचा चेहरा मोहरा पूर्णतः बदलणार आहे. त्याचबरोबर सरनाईक यांनी आणखी एक नवीन निर्णय घेतला आहे तो म्हणजे एसटी डेपोमध्ये एसटीचे स्वतःचे डिझेलचे पंप आहेत हे ऑइल कंपन्यांना चालवण्यास देऊन त्याद्वारे एसटी महामंडळाला वाढीव उत्पन्नाचा एक नवीन स्त्रोत निर्माण करता येऊ शकेल असे त्यांचे प्रयत्न आहेत. त्याचबरोबर भाडेतत्त्वावरील बसेस बंद करण्याचा निर्णय घेऊन आगामी काळात ५०० नवीन बस गाड्या घेण्याचा मनोदयही त्यांनी व्यक्त केला आहे. एसटी महामंडळ तोट्यातून जर फायद्यात येणार असेल, तर निश्चितच अशा धाडसी निर्णयांचे स्वागतच केले पाहिजे मात्र त्याचबरोबर हे धाडसी निर्णय अंगावर येणार नाहीत याची देखील काळजी परिवहन मंत्र्यांनी तसेच राज्य सरकारने घेण्याची गरज आहे. उत्पन्नाचे वाढीव स्त्रोत शोधताना एक गोष्ट लक्षात घेण्याची गरज आहे ती म्हणजे महाराष्ट्रात जी मोठ्या प्रमाणावर खासगी अवैध प्रवासी वाहतूक फोफावलेली आहे तिला जर प्रतिबंध करायचा असेल, तर केवळ कायदे अथवा नियमांचा धाकदपटशा दाखवून अवैध प्रवासी वाहतूक बंद होणार नाही, तर त्या पलीकडे जाऊन यामध्ये अधिक काम करण्याची गरज आहे. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राला जोडून असलेले काही शेजारी राज्य की जी पर्यटनदृष्ट्या आणि व्यावसायिकदृष्ट्या महाराष्ट्राशी एकरूप आणि समरूप झाली आहेत अशा राज्यांमध्ये जर का महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमधून किमान पर्यटनाच्या हंगामामध्ये जरी खासगी आरामदायी बस सेवेसारखी दर्जेदार व सेवा एसटी महामंडळाकडून या मार्गांवर जर का प्रवाशांना उपलब्ध होऊ लागली, तर निश्चितच खासगी बस सेवेकडील प्रवाशांचा ओघ हा एसटी महामंडळाकडे वळल्याशिवाय राहणार नाही. मात्र त्यासाठी प्रचंड इच्छाशक्ती, प्रयत्नांची शिकस्त, एसटीच्या कामात सुसूत्रता, शिस्तबद्धता आणि सचोटीची नितांत गरज आहे. तरच महाराष्ट्राची लाडकी लालपरी ही आगामी काही वर्षांत अधिक स्मार्ट दिसू शकेल

# शिवाजीनगर पोलीसांची अवैध गूटखा विक्री कारवाई



बीड । अवैध गुटखा विक्री करणाऱ्या आरोपीवर शिवाजीनगर पोलीसांनी कारवाई करुन८९,४००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त. दिनांक २१/०१/२०२५ रोजी पोलीस स्टेशन शिवाजीनगर, बीड हद्दीत एक इसम हा अवैधरित्या गुटख्याची विक्री करण्यासाठी येत आहे अशी गोपनीय बातमी मीळाल्यावरुन पोलीस निरीक्षक मारोती खेडकर यांनी पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथील डी. बी. पथकातील पोलीस हवादार / १६६४ रविंद्र आघाव पो.शि. २०७७ बाळु रहाडे, पो.शि. ९८३ सुदर्शन सारणीकर, पो.शि. ९०४ लिंबाजी महानोर यांना कारवाई करण्याबाबत आदेशीत केल्याने डी. बी. पथकातील अंमलदार यांनी नगर नाका येथे मिळालेल्या बातमीच्या सापळा लावुन गुटखा विक्रीसाठी सुझुकी ऑक्सेस गाडी क्र. चक २३ -ट ५७१५ यावर आलेला आरोपी नामे विशाल रामदार जाधव वय २३ वर्षे, रा. जाधव गल्ली, शाहु नगर, बीड या १९,४००/- रुपयाचा गुटख्यासह पकडयात आले. त्याने सदरचा गुटखा हा त्यास जावेद शेख उर्फ बब्बु रा. महाराष्ट्र किराणा दुकान, मोमीनपुरा बीड याचेकडुन विक्री साठी आणल्याचे सांगीतले. यावरुन फिर्यादी नामे बाळु बाजीराव रहाडे वय ३२ वर्षे, व्यवसाय-नोकरी पो.शि. २०७७ शिवाजीनगर पोलीस स्टेशन, बीड यांचे फिर्यादीवरुन गु.र.नं. ३९/२०२५ बी.एन.एस.एस. कलम १२३,२२३,२७४, प्रमाणे आरोपी नामे १) विशाल रामदार जाधव वय २३ वर्षे, रा. जाधव गल्ली, शाहु नगर, बीड (२) जावेद शेख उर्फ बब्बु रा. महाराष्ट्र किराणा दुकान, मोमीनपुरा बीड यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला सदर गुन्हाचा तपास स.पो.नि. संदीप दुनगहु हे करत आहेत. सदरची कामगिरी ही मा. पोलीस अधिक्षक श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधिक्षक श्री. सचिन पांडकर, उपविपोअ विश्वंबर गोल्डे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. मारोती खेडकर, डी.बी. पथकातील पोलीस हवादार /१६६४ रविंद्र आघाव, पो.शि. २०७७ बाळु रहाडे, पो.शि. ९८३ सुदर्शन सारणीकर, पो.शि. ९०४ लिंबाजी महानोर यांनी केली आहे.

# महाकुंभमेळ्याचे धार्मिक आणि आर्थिक महत्त्वही अगणित

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाकुंभ मेळाव्याचा गौरव केला असून त्यांनी हा मेळावा म्हणजे देशाची एकता, समानता आणि सलोखा यांचा उत्सव असल्याचे म्हटले आहे. मोदी यांच्याकडून महाकुंभ मेळाव्याची स्तुती केली जात असतानाच मेळाव्यात जमलेल्या कोट्यवधी हिंदू जनांना आपलाच गौरव झाल्यासारखे वाटत असल्यास नवल नाही. कारण या पूर्ण महाकुंभ मेळ्यास देशभरातून कोट्यवधी हिंदू जन जमले आहेत. मेळावा प्रयागराज येथे होत आहे. याच मेळाव्याच्या बरोबरीने देशात इतरत्र होत असलेल्या हिंदू मेळाव्यांचे उदाहरण देऊन मोदी यांनी धार्मिक उत्सवांची उदाहरणे दिली आहेत आणि त्यातही एकता आणि समानता यांचा गौरव केला जातो हे सांगितले. महाकुंभ हा गंगा, यमुना आणि सरस्वती यांच्या संगमस्थळी म्हणजे प्रयागराज येथे होत असून हजारो वर्षांची ही परंपरा आहे. पंतप्रधानांनी आपल्या ङ्गमन की बातफ या कार्यक्रमात महाकुंभ मेळाव्याची प्रशंसा केली असून त्यांनी उत्तरेकडून ते दक्षिणेकडे सर्वत्र आपला धार्मिक विश्वास कसा एकच आहे हे पटवून दिले. आपले सर्व सण, उत्सव हे नद्यांच्या किनारीच साजरे केले जातात हे सांगून मोदी म्हणाले की, हिंदुस्थानच्या दक्षिण आणि उत्तरेतही समान धागा आहे तो या उत्सवांचा. यंदाही या महाकुंभ मेळाव्यास हिंदू बांधवांचा प्रचंड प्रतिसाद लाभला आहे आणि त्यांच्यासाठी प्रयागराज येथे चोख व्यवस्था केली आहे. अर्थात एवढा मोठा उत्सव म्हटले की, एखादी दुर्घटना ही घडतेच. पण यंदा ती दुर्घटना घडली तरीही तिने फार नुकसान झाले नाही. महाकुंभ मेळ्यात आगीची एक दुर्घटना घडली आणि त्यात फारसे नुकसान झाले नाही. गीता प्रेसच्या तंबूला आग लागली आणि ती वेळीच आटोक्यात आणण्यात आली, पण विरोधकांना एवढेही कारण पुरेसे होते आणि त्यांनी लगेच बोंब सुरू केली की, सरकारने अधिक काळजी घ्यायला हवी होती. काँग्रेसने यात अधिकच बोंब मारली आणि उत्तर प्रदेशातील समाजवादी पार्टीचे नेते अखिलेश यादव यांनी काँग्रेसला साथ दिली. झाली ती घटना वाईटच आहे आणि कुणीच तिचे समर्थन करणार नाही. पण हे निमित्त करून काँग्रेसने आणि सपाने भाजपावर म्हणजे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यावर टीका करणे म्हणजे त्यांच्या ढोंगीपणाची परिसीमा झाली. कारण काँग्रेसच्या काळात हिंदू धर्माला सोडून अन्य धर्माला महत्त्व दिले जात होते. काँग्रेसच्या काळात हज यात्रेला महत्त्व दिले जात होते आणि त्यांच्यासाठी सरकारी पैसा आणि वाहतूक व्यवस्था सज्ज होती. त्या काँग्रेसने कुंभमेळ्यात आग लागली म्हणून भाजपा सरकारवर टीका करणे म्हणजे क्षुद्रपणाचे वर्तन करण्यासारखे आहे. या महाकुंभ मेळाव्यासाठी जगभरातून भाविक येतात. त्यात गरीब आणि श्रीमंत एक भावनेने येत असतात. याचे कौतुक मोदी यांनी केले. योगी आदित्यनाथ महाकुंभ मेळाव्यातील व्यवस्थेवर जातीने देखरेख करत असून त्यांनी आगीच्या घटनेवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रशासनाला सहाय्य केले. मुख्यमंत्री राज्यकारभारात दक्ष असले की काय होते आणि प्रशासनही त्याच्यापुढे काम करू लागते हे आदित्यनाथ यांनी दाखवून दिले आहे. महाकुंभ मेळाव्यात प्रशासनात अग्निशामक दल, एनडीआरएफ आणि एसडीआरएफ दले समाविष्ट आहेत आणि त्यांनी त्यांचे काम करताना कालची आग झटकन आटोक्यात आणली. यात समाधानाची बाब ही आहे की, महाकुंभ मेळाव्यात आग लागली असली तरीही नुकसान झालेले नाही. त्यामुळे विरोधकांची एक संधी हुकली आहे. महाकुंभ २०२५ चा मेळावा हा अत्यंत प्रतिष्ठेचा मेळावा असून त्यात लाखो, करोडो भाविक सहभागी झाले आहेत. आंतरराष्ट्रीय माध्यमांनी या मेळाव्याचेच कव्हरेज केले असून भारतासाठी ही प्रतिष्ठेची बाब आहे. महाकुंभ मेळाव्यामुळे भारताची अर्थव्यवस्थाही सुधारण्यास मदत होणार असून त्यामुळे कित्येक कोटी लोकांना रोजगार मिळणार आहे तसेच कित्येक लोकांचे जीवनमान त्यावर उंचावणार आहे. हा लाभ नजरेआड करून चालणार नाही. महाकुंभ मेळाव्याने आंतरराष्ट्रीय लक्ष खेचून घेतले असून बीबीसी आणि न्यूयॉर्क टाइम्स यांनीही या मेळाव्याचे वार्तांकन केले आहे आणि त्यांचे प्रतिनिधी तेथेच अद्यापही तळ ठोकून आहेत. एकूण महाकुंभ मेळाव्याकडे फक्त धार्मिक मेळावा म्हणून पाहाता येणार नाही, तर भारताला एकसंध ठेवणारा आणि देशातील लोकांत धार्मिक सलोखा आणि राष्ट्रीय एक्याची भावना मजबूत करणारा उत्सव म्हणून त्याकडे पाहिले जाते. या महाकुंभ मेळाव्याने त्याचीच प्रचिती परत एकदा आणून दिली आहे. महाकुंभ मेळावा हा मानवजातीचा सर्वात विशाल मेळावा मानला जातोच. पण तो सर्वाधिक व्यापारी करार करण्यात अग्रेसर आहे असे अनुमान आहे. यंदाच्या महाकुंभ मेळाव्यात चार लाख कोटी रुपयांहून अधिक व्यापार होण्याची शक्यता असून भारतीय अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणावर चालना देण्यातही महाकुंभ मेळाव्याची मोठी भूमिका असेल. यंदाचा महाकुंभ मेळावा देशाच्या अर्थव्यवस्थेला अधिक प्रमाणावर चालना देण्याची शक्यता व्यक्त केली जात असून त्याच्या आयोजनातून देशाची जीडीपीत एक टक्के वाढ नोंदवली जाईल असे सांगितले जाते. सरकारी महसुलातही या मेळाव्यामुळे चांगली वाढ होईल

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २४ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## स्किल बेस एज्युकेशन आजच्या काळाची गरज आहे प्राचार्य डॉ. गणेशचंद्र शिंदे



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : शारदा भवन एज्युकेशन सोसायटी द्वारा संचलित यशवंत महाविद्यालयात दि.२०-जानेवारी रोजी पालक शिक्षक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश चंद्र शिंदे होते.सद्यस्थितीलां उच्च शिक्षणामध्ये खूप मोठ्या प्रमाणामध्ये बदल होत आहे.या बदलाला सामोरे जाण्यासाठी यशवंत महाविद्यालय देखील आधुनिक शैक्षणिक साधन सामग्रीने सुसज्ज होत आहेत महाविद्यालयामध्ये स्मार्ट क्लासरूम, स्मार्ट लॅबोरेटरी आर्टिफिशियल इंटेलिजन्स यासारख्या एज्युकेशनल टूलचा वापर केला जात आहे आणि विद्यार्थ्यांपर्यंत जास्तीत जास्त नवीन संकल्पना आणि नॉलेज पोहोचण्याचे काम केले जात आहे.बदलत्या काळाबरोबर संशोधन आणि रोजगाराच्या नवीन संधी देखील निर्माण होत आहेत परंतु या संधीचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडे स्किल बेस एज्युकेशन असणे आवश्यक आहे जर हे स्किल बेस एज्युकेशन नसेल तर निर्माण होणा-या रोजगाराच्या संधीचां लाभ आपल्या विद्यार्थ्यांना मिळणार नाही म्हणून ख-या अर्थाने स्किलबस एज्युकेशन ही आजच्या काराची गरज आहे असे मत प्राचार्य गणेश शिंदे त्यांनी व्यक्त केले.प्रस्तुत कार्यक्रमाचे आयोजन पालक शिक्षक मेळावा समिती ने केले होते.कार्यक्रमाची प्रस्ताविक पालक शिक्षक मेळावा समितीचे संयोजक प्रोफेसर डॉ. शिवराज सिरसाट यांनी केले.

पालक प्रतिनिधी म्हणून सौ.ज्योती डोंगळीकर यांनी महाविद्यालयाचे शैक्षणिक वातावरण आणि स्पर्धा परीक्षांचे महत्त्व विशद केले, सौ.भावना सोलंकी यांनी विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत महाविद्यालय शिक्षक आणि प्राचार्य यांची भूमिका विशद केलें, सुधाकर राठोड यांनी इनोव्हेटिव्ह प्रोजेक्ट मुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजण्यास मदत होते असे मत व्यक्त केले तर प्रमोद पवार यांनी विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांबरोबरच पालकांची देखील भूमिका महत्त्वाची आहे असे मत व्यक्त केले.प्रस्तुत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डी.डी भोसले यांनी केले

प्रस्तुत कार्यक्रम प्रसंगी पालक शिक्षक मेळावा समितीचे सदस्य प्रा. धनराज भुरे ,प्रा. रमेश चीलावर , चिकटे,प्रा. मिरा फड ,प्रा. नरवाते , प्रा.प्रवीण मिरकुटे प्रा.निलेश चव्हाण प्रा. एन. बी. गव्हाणे, प्रा. एस.एस. वाकोडे तसेच प्रा.प्रवीण मिरकुटे प्रा.निलेश चव्हाण प्रा.नरवाते , प्रा.साहेबराव शिंदे याचबरोबर महाविद्यालयातील प्राध्यापक आणि पालक प्रतिनिधी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते प्रस्तुत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्रबंध संदीप पाटील तसेच गजानन पाटील आणि बिरादार यांनी मोलाची भूमिका पार पडली

## प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर फ्लाईंग ऑफिसर दामिनी देशमुख करणार पुष्पवृष्टी



नवी दिल्ली २३: प्रजासत्ताक दिनाच्या राजधानीतील कर्तव्यपथावरील मुख्य सोहळयात महाराष्ट्राची कन्या फ्लाईग ऑफिसर दामिनी देशमुख ध्वजारोहणानंतर ध्वजावर पुष्पवृष्टी करणारआहे.बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यामधील देवडी गावची दामिनी दिलीप देशमुख वायुदलात फ्लाईग ऑफिसर म्हणुन कार्यरत असून राजधानी दिल्लीतील कर्तव्य पथावर होणा-या मुख्य सोहळयात परेड कमांडरफ म्हणून जबाबदारी सांभाळणार आहे.. दामिनीचे वडील न्यायधीश दिलीप देशमुख हे पुणे विभागाचे माजी धर्मादाय आयुक्त कमिशनर असून त्यांचा कुटुंबियांचा सामाजिक आणि शैक्षणिक वारसा दामिनीने आपल्या मेहनतीने पुढे नेला आहे.



वर्ष २०१९ मध्ये देशपातळीवरील कॉमन अॅड.मिनिस्ट्रेटिव्ह परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत भारतीय वायुदलात फ्लाईग ऑफिसर पद मिळवले. दामिनी अश्वारोहन, कराटे, योगा, रायफल शूटिंग, तसेच खो-खो आणि व्हॉलीबॉलमध्येही प्राविण्य मिळवली आहे. ती कराटेमध्ये ब्लॅक बेल्टची सुवर्णपदक विजेती आहे. ध्वजारोहण दरम्यान पुष्पवृष्टी करणार२६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी राष्ट्रपती ध्वजारोहण करतील त्यावेळी ध्वजाला मानवंदना देण्यासाठी विमानातून पुष्पवृष्टी करण्याची जबाबदारी फ्लाईग ऑफिसर दामिनी देशमुख यांना सोपविली आहे.

## नागनाथ विद्यालयात तब्बल १७ वर्षानंतर गेटटूगेदर संपन्न

बीड प्रतिनिधी

बीड : नागनाथ विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा साजरा झाला. तब्बल १७ वर्षानंतर भेट झाल्याने मैत्रिणींचा आनंद गगनात मावेनासा झाला. या मेळाव्यात मैत्रिणींनी एकमेकींच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला.नागनाथ विद्यालय मोरगाव बीड सन २००७-८ च्या वर्गातील मित्र मैत्रिणींचा स्नेह मेळावा तब्बल १७ वर्षानंतर मोठ्या उत्साहात मोरगाव नगरीत संपन्न झाला.एक दिवसांचा हा कार्यक्रम अतिशय उत्साही व आनंददायी वातावरणात साजरा केला.

यावेळी २००७-८ बॅंचचे गेटटूगेदर स्वप्नं पूर्ण झाले, घेतलेली मेहनत आणि वेळ काढून भेटायला आलेल्या महाराष्ट्राच्या कानाकोर्पयातील मित्र मैत्रिणींनी आपल्या आनंददायी प्रेमरुपी या मोहात रम्य राहून पुन्हा काही दिवसांत भेटूया, असे म्हणत नाविण्यपूर्ण जीवनातील यशस्वी पाऊल घेऊन एकमेकींनी आनंद अश्रूंनी निरोप घेतला.



## क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम

बीड, दि,२३ :- (जि. मा. का.) भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७६ वा वर्धापन दिनाचा मुख्य शासकीय समारंभ रविवार दि. २६ जानेवारी २०२५ रोजी पोलिस मुख्यालय मैदानावर क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते सकाळी ९ वाजून १५ मिनिटानी ध्वजारोहण कार्यक्रम होणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ८ वाजून १५ मिनिटांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण समारंभ होत आहे.

तसेच मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील ध्वजारोहणाचा कार्यक्रम अपर जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते सकाळी ७.४५ वाजता संपन्न होणार आहे. दोन्ही ध्वजारोहण समारंभ संपल्यानंतर अधिकारी व कर्मचारी यांनी जिल्हा पोलीस मुख्यालय मैदान बीड येथील ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय समारंभास सकाळी ८.३० वाजेपूर्वी शासकीय गणवेषात उपस्थित रहावे, असे आवाहन, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

यासह जिल्हयात विविध ठिकाणी ध्वजारोहण केले जाणार असून अपर जिल्हाधिकारी कार्यालय अंबाजोगाई येथील धजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ अपर जिल्हाधिकारी यांच्या हस्ते सकाळी ९.१५ वाजता तसेच सर्व तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी मुख्य ध्वजारोहणाचा कार्यक्रम सकाळी ९.१५ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

********

## राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त रॅलीचे आयोजन

बीड, दि. २३ :-भारत निवडणूक आयोगाव्दारे निर्देशित पंधरावा राष्ट्रीय मतदार दिन दि. २५ जानेवारी २०२५ रोजी साजरा करण्यात येत आहे. राष्ट्रीय मतदार दिन साजरा करणसाठी दि. २५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथून छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय या मार्गावर रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.यानंतर सकाळी ११.०० वाजता राष्ट्रीय मतदार दिनाचा मुख्य कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला असल्याचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी बीड यांनी कळविले आहे.

## बीडनजीक होणारा उड्डाणपूल 3 पदरीऐवजी ६ पदरी होणार



सोलापूर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाच्या बीडच्या वळण रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अपघात होतात. येथील महालक्ष्मी चौकात उड्डाणपूल तयार केला तर हे अपघात टाळता येतील, असा प्रस्ताव डॉ.योगेश क्षीरसागर यांनी भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाकडे गतवर्षी दिला होता. यात महालक्ष्मी चौकातील उड्डाणपुलासोबतच स्लिप रोडची देखील मागणी करण्यात आली होती. या पत्रांचा संदर्भ देत ना.नितीन गडकरी यांच्या आदेशावरून भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाने तांत्रिक शक्यता तपासून अहवाल सादर केला. त्यांनतर इतर प्रक्रिया पूर्ण होऊन निविदाही निघाल्या होत्या. परंतु हे उड्डाणपुलाचे काम ३ पदरी होणार असल्याचे विभागाकडून सांगण्यात आले. त्यातही अनेक त्रुटी होत्या. त्यामुळे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्या कानावर हा प्रकार घातला. त्यांच्या माध्यमातून अजितदादा पवार यांच्यासमोर हा प्रश्न मांडला. त्यानंतर सुचनेची दखल घेऊन त्यांनी संबंधित विभागांच्या अधिकार्यांना योग्य त्या सर्व सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता उड्डाणपुलाच्या कामात मोठा बदल होणार असून ३ पदरीऐवजी ६ पदरी उड्डाणपूल दोन्ही बाजूने उभारण्यात येणार आहे. तसेच, प्रस्तावित तीन ठिकाणीच स्लीप रोड होणार आहे.

## लिंबागणेश येथील रोहित्रामध्ये बिघाड ; उच्चदाबाच्या वीजेमुळे घरगुती विद्युत उपकरणांचे नुकसान ; रिकाम्या खुर्चीला हार घालुन ग्रामस्थांनी निषेध व्यक्त केला :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- ( दि.२२ ) बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील बसस्थानकावरील रोहित्राचा अचानक बिघाड झाल्याने अचानक उच्चदाबाच्या विजेमुळे अनेक घरातील घरगुती विद्युत उपकरणे जळुन ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. गावाला विद्युत पुरवठा करणा-्या तारा या झाडाझुडपातून आलेल्या असुन वारंवार तांत्रिक बिघाड होत असुन महावितरण कडुन योग्य देखभाल दुरुस्ती करण्यात येत नाही.गेल्या ३ महिन्यांपासून लिंबागणेश येथील सहाय्यक अभियंता पद गेल्या ३ महिन्यांपासून रिक्त असुन चौसाळा येथील सहाय्यक अभियंता अभिजित शिंदे यांच्याकडे अतिरिक्त पदभार देण्यात आलेला आहे. दीड महिन्यांपूर्वी रिक्त पद भरण्यात यावे यासाठी ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते.अखेर आज डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी श्रीफळ फोडून



रिकाम्या खुर्चीला हार घालुन निषेध व्यक्त केला.यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, माजी सरपंच मंडलिक , विक्की आप्पा वाणी, संतोष वाणी,संतोष भोसले, अशोक जाधव,संजय घोलप,रामकिसन गिरे,संजय सुकाळे, चंद्रकांत आवसरे, सर्जेराव मुळे, गणेश घाडगे, अनिल ढवळे , अशोक ढास आदि ग्रामस्थ उपस्थित होते.

आठवडाभरापासून शेतीला तर दुरच पण जनावरांना पाणी नाही:- रामकिसन गिरे

बसस्थानक येथील रोहित्रामध्ये गेल्या आठवडाभरापासून बिघाड असल्याने शेतीला पाणी देणे तर दुरच पण जनावरांना पाणी पाजण्याची अडचण झाली आहे. त्यामुळे शेतक-यांची अडचण तातडीने दुर करावी.

महावितरणने तातडीने दखल न घेतल्यास तिव्र आंदोलन :- रविंद्र निर्मळ ( सेवा सोसायटी चेअरमन लिंबागणेश)

---

महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे ग्रामस्थ हैराण असुन त्याचा सर्वप्रथम मी निषेध करतो. विद्युत कर्मचारी मुख्यालयी रहात नाहीत त्यामुळे रात्री अपरात्री बिघाड झाल्यानंतर ग्रामस्थांनाच दुरुस्ती करावी लागते. तातडीने महावितरणने उपाययोजना न केल्यास तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा आम्ही महावितरणला देत आहोत.

३ महिन्यांपासून सहाय्यक अभियंता पद रिक्त असल्याने रिकाम्या खुर्चीला हार :-

---

लिबागणेश येथील ३३ केव्ही केंद्रातील सहाय्यक अभियंता पद ३ महिन्यांपासून रिक्त आहे.दीड महिन्यांपूर्वी मांजरसुंभा ते पाटोदा राज्य मार्गावरील लिंबागणेश बसस्थानक येथे रास्तारोको आंदोलन करण्यात आले होते. तेव्हा तातडीने पदाची भरती करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. बसस्थानक येथील रोहित्रात बिघाड असल्याने घरामधील विद्युत उपकरणांमध्ये वीजप्रवाह उतरत आहे त्यामुळे भविष्यात जीवघेणा धोका उद्भवू शकतो याची गांभीर्याने दखल घ्यावी यासाठी आज रिकाम्या खुर्चीला हार घालुन निषेध व्यक्त केला.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

## नामदार पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात गेवराई तालुक्यात विकास गंगा वाहणार- श्रीकांत सानप

## नागरिकांनी भाजपा सदस्य नोंदणी अभियानात सहभागी व्हावे

देशात आणि राज्यात प्रत्येक तीन वर्षाला भाजपा सदस्य नोंदणी करते. व नवीन संघटनात्मक नेमणुका होतात. या सदस्यता नोंदणी अभियानात गेवराई तालुक्यात मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. यापूर्वी जिप गट मादळमोही, चकलांबा, जातेगाव, कोळगाव, पाचेगाव, गेवराई शहर या ठिकाणी भाजपा सदस्यता नोंदणी मोठ्या प्रमाणात केली आहे. ना.पंकजाताई मुंडे यांनी जात पात,धर्म, न पाहता सर्व समाजाला सोबत घेऊन, विकास कामे केली आहेत.सर्व वंचित घटकांना न्याय दिला आहे. या अभियानाद्वारे आपल्या नेत्या ना.पंकजाताई मुंडे यांचे हात बळकट करण्यासाठी गावोगाव अभियान राबवून मोठ्या प्रमाणात सदस्यता नोंदणी करणार असे, माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश हात्ते यांनी जाहीर केले आहे.




गेवराई : प्रतिनिधी देशभरात भारतीय जनता पार्टीचे संघटन पर्व अंतर्गत भाजपा सदस्यता अभियान-२०२४ सुरु आहे. शनिवारी गेवराई विधासभेतील तलवाडा याठिकाणी राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री, लोकनेत्या ना.पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली, सदस्यता नोंदणी अभियान कार्यक्रम राबवून मोठ्या संख्येने सदस्यता नोंदणी करण्यात आली. यावेळी विधानसभा समन्वयक श्रीकांत सानप यांनी बोलताना सांगितले की, नामदार पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात गेवराई तालुक्यात विकास गंगा वाहणार आहे. तरी नागरिकांनी भाजपा सदस्य नोंदणी अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन देखील सानप यांनी केले.देशात आणि राज्यात भाजपाची सत्ता आलेली आहे,देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात अतिशय जलद गतीने विकास होत आहे. शेतकरी,महिला,कामगार,युवा, यांच्यासाठी विविध विकास योजना राबवून लाभ देण्यात येत आहे. नवीन सरकार मध्ये राज्याच्या लोकप्रिय, कार्यक्षम व दूरदृष्टीच्या नेत्या ना.पंकजाताई मुंडे या मंत्री आहेत. यापूर्वी पंकजाताई मुंडे मंत्री असताना बीड जिल्ह्यात रस्ते,सिंचन, विज,कृषी, आरोग्य,शिक्षण, महिला ,युवा या क्षेत्रात अभूतपूर्व विकास कामे झालेले आहेत. त्या दरम्यान गेवराई तालुक्यासाठी ना.पंकजाताई मुंडे यांनी विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. या वेळी देखील गेवराई तालुक्यात मोठया प्रमाणात विकास निधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे या विकास गंगेत सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन तलवाडा येथे भाजपा सदस्यता नोंदणी अभियानात, गेवराई विधानसभा समन्वयक श्रीकांत सानप यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका अभियान संयोजक ईश्वर पवार यांनी केले व कार्यक्रमाचे आभार पंचायत समिती सदस्य श्याम कुंड यांनी केले. या वेळी भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश काका सुरवसे, माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश हात्ते,मा पंस सदस्य श्याम कुंड, तालुका अभियान संयोजक ईश्वर पवार, सेवा सोसायटी चेअरमन जयराम नाटकर ,फोजी भाई, सचिन वावरे, सचिन दाभाडे , विठ्ठल हात्ते , विकास हात्ते, आर आर आबा , दत्ता मस्के, कृष्णा कावळे, भारत चव्हाण, मंजित शिंदे, विष्णू मरकड, मछिंद्र थोरात,दत्ता शिंगणे, अन्य प्रमुख कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २४ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी



हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांचे शिवसेना जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून सर्व शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी मोठ्या उत्साहात जयंती साजरी केली. यावेळी जिल्हा संघटक रतन तात्या गुजर,तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण, उपतालुकाप्रमुख अशोकजी सगळे, उपतालुकाप्रमुख प्रकाशजी धुताडमल, युवासेना उपजिल्हाप्रमुख ऋषी भैय्या गिरी, युवासेना उपतालुकाप्रमुख मनोज भैय्या डोंगरे,विनोद गूंड पाटील,दिपक घोडके पाटील,अजय गायकवाड,मुकेशजी घुमरे,विशाल दिवटे,अशोक जाधव,मुन्ना जाधव,सुरज पाडुळे,साहिल शेख,यशराज डोके,पविण आनेराव सह सर्व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीडच्या शिवदासने पत्नीच्या गळ्यात कात्री खुपसली म्हणाला तू माझ्या घरची लक्ष्मी होतीस

बीड जिल्ह्यातील मूळ रहिवासी असलेला शिवदास तुकाराम गिते व त्याची पत्नी ज्योती शिवदास गिते हे दोघे पुणे शहरातल्या खराडी भागात असलेल्या गल्ली क्र. ५ मधील तुळजाभवानी नगरमध्ये राहत आहे. तो येथील न्यायालयामध्ये लिपीक पदावर काम करत होता. ज्योती आणि शिवदास यांच्यात कौटुंबिक वाद होते. त्याचबरोबर तो ज्योती हिच्या चारित्र्यावर संशय घेण्याबरोबर ज्योती आपली मालमत्ता हाडप करेल, असेही त्याला सातत्याने वाटायचे. रात्री उशिरा शिवदास याने आपल्या मुलांसमोर ज्योतीच्या गळ्यावर शिलाई मशीनची कात्री खुपसली. एकाच वारात ज्योती खाली पडली. रक्तस्त्राव झाल्याने तिचा जागेवरच मृत्यू झाला असावा मात्र ज्या वेळेस या दोघांतील वाद सुरु झाला आणि



शिवदासने हल्ला केला त्यावेळेस ज्योतीने आरडाओरड केल. त्यावेळेस शेजारच्यांनी त्यांच्याकडे धाव घेतली. ज्योती रक्ताच्या थारोळ्यात पडलेली त्यांना दिसली. त्यांनी चंदननगर पोलिसांना याची माहिती दिली. पोलिस घटनास्थळी येण्यापूर्वी शिवदास याने तब्बल साडेतीन मिनिटांचा व्हिडिओ चित्रीत केला. हा व्हिडिओ चित्रीत करताना त्याने रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या आपल्या पत्नीकडे कॅमेरा ठेवत

### हत्येनंतर साडेतीन मिनिटांचा व्हिडिओ

दरम्यान, आरोपी पतीन शिवदास गिते याने या प्रकरणी माहिती देणारा व्हिडीओ देखील शूट केला आहे. यामध्ये दिलेल्या माहितीनुसार, मला मारायचा प्रयत्न केला हे मला उशिरा कळलं. मला माझ्या संरक्षणासाठी हा सगळा प्रकार करावा लागला. माझी इच्छा नव्हती तिला माराव किंवा काही करावं. माझ्या घराची लक्ष्मी होती. या मुलीने माझ्या मुलाला जन्म दिला. तिचे सगळे भाऊ वाढीव आहेत. तिच्या भावाने मला मारण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मला माराव लागलं. मला या महिलेने मारून टाकण्याचा प्रयत्न केला होता. या महिलेने तिची माणसं पुण्यात पेरलेली आहेत.

त्याच्यामध्ये तो बोलत आहे. त्याच्या व्हिडिओमधील बोलण्यामध्ये तू घरातली लक्ष्मी होतीस, पण तू मला फसवले यासह महुणा आणि अन्य दोन ते तीन लोकांचे नावे घेत यांच्यापासून आपल्या जिवाला धोका असल्याचे त्याने म्हटले आहे आणि हा व्हिडिओ त्याने त्याच्या कार्यालयीन एका ग्रुपवर टाकल्याचे सांगण्यात येते. दुसरीकडे चंदननगर पोलीस घयनास्थळी आले, त्यांनी रक्ताच्या थोराळ्यात पडलेल्या ज्योतीला रुग्णालयात दाखल केले मात्र तत्पूर्वी तिचा मृत्यू झाला होता. क्रोर्याची परिसीमा गाठणारी संतापजनक घटना घडल्याने पुणे शहर हादरून गेले आहे. इथेही बीडचा मारेकरी असल्याचे समोर आल्याने बीड जिल्ह्यातही या घटनेने खळबळ उडवून दिली. आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.

# सायरन वाजताच पाच चोरट्यांनी धूम ठोकली

अंबाजोगाई । किसान न्युज शहरातील दुर्गा नगर भागात पाच चोरटे चोरीच्या उद्देशाने घुसले पण येथे आधुनिक तंत्रज्ञानाचे बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये चोरटे येताच सायरन वाजण्यास सुरुवात झाली अन् चोरट्यांनी धूम ठोकली. यामुळे येथे चोरीचा प्रयत्न फसला आहे.



व्हायरल व्हिडिओ मध्ये पाच जण पळत

असल्याचे दिसून येत असून आधुनिक तंत्रज्ञानाचा येथे फायदा झाल्याचे दिसून येत आहे. शहरातील एलआयसी रोडवरील दुर्गा नगर या भागातील नागरिकांनी येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. यामध्ये संशयित व्यक्ती येताच सायरन वाजण्यास सुरुवात होते. आज गुरुवारी (दि.२३) पहाटेच्या सुमारास ५ चोरटे या भागात आले. ते जसेच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद होताच सायरन वाजण्यास सुरुवात झाली. अन् या आवाजाच्या भीतीने चोरट्यांनी धूम ठोकली. याचा व्हिडिओ सकाळपासून मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. यामध्ये पाच जण पळत असल्याचे दिसून येत आहे. या सीसीटीव्ही व सायरनमुळे येथे घडणारी चोरीची घटना टळली आहे.

## जि.प.शाळेसमोर कचऱ्याचा उकीरडा

### स्वच्छ बीड ही संकल्पना फक्त कागदावरच



बीड, :-जिल्हा परिषद कार्यालयासह इतर सर्व कार्यालय स्वच्छ असावेत असा आदेश केंद्र आणि राज्य सरकारचा आहे. मात्र अनेक कार्यालयाच्या भोवती मोठ्या प्रमाणात कचरा असतो. घाणीचे साम्राज्य असते. गजानन नगर येथील जि.प. शाळा घाणीच्या विळख्यात सापडली. आजु बाजुला कचऱ्याचा उकीरडा जमा झाला आहे. नगर पालिका प्रशासनाची स्वच्छ बीड संकल्पना ही फक्त कागदावर असल्याचे दिसून येवू लागले. स्वच्छतेवर केंद्र आणि राज्य सरकार दरवर्षी कोट्यावधी रूपये खर्च करत आहे. एवढा खर्च करून देखिल शासकीय कार्यालय आणि कार्यालयाचा परिसर स्वच्छ दिसत नाही. जिल्हा परिषद कार्यालयाच्या माध्यमातून स्वच्छतेबाबत संबधित विभागाला धडे दिले जातात. शहरातील गजानन नगर भागातील जि.प. शाळेच्या आवारात घाणीचे साम्राज्य आहे. रस्त्याच्या समोर कचऱ्याचा ढिग पडला. गेल्या दोन महिन्यापासून हा कचरा उचलला नसल्याचे दिसूनयेवू लागले. नगर पालिका प्रशासन नुसतेच स्वच्छतेबाबत आव आणत असते. स्वच्छ बीड ही संकल्पना फक्त कागदावर दिसून येवू लागली.

## के.एस.के.महाविद्यालयातील रसायनशास्त्रविभागामार्फत व्याख्यानाचे आयोजन

बीड येथील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात रसायन शास्त्र विभागातील बी.एस्सी. प्रथम, द्वितीय,तृतीय आण एम.एस्सी प्रथम, द्वितीयच्या विद्यार्थ्यांना क्रीस्टल फिल्ड थेरी या विषयावर मिलीया महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापक डॉ रमेश वारे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.त्यांनी रसायनशास्त्रा मधील व भारता बाहेर रिसर्च या विषयावर माहिती विषद केली. शास्त्रज्ञांनी लावलेल्या क्रिस्टल फिल्ड येझर यावर यांचे सखोल असे विद्यार्थ्यांना त्यांनी मागर्दशन केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांनी अशा व्याख्यानमाल`साठी उत्स्फूत सहभाग घेऊन व्याख्यानाचे विचार आचरणामध्ये आणून आपला व्यक्तीगत विकास व आपल्या भविष्यकाळाचा उपयोग



करून घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सोनाजी गायकवाड यांनी केले तर आभार डॉ.एल.एस. गाडेकर यांनी मानले. या व्याख्यानास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर ,पदव्युत्तर संचालक डॉ.ए.एस. खान, कमवि उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर,डॉ.पंडित खाकरे,डॉ.एल.एस.गाडेकर,प्रा.अतुल चव्हाण,प्रा.दिपक पवार,प्रा.किर्ती पांडूळे आदीसह महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होत

## घरकुल योजनेचा नागरिकांनी लाभ घ्यावा : जहागीरदार



प्रधानमंत्री आवास योजना २.० सुरुवात झाली असून, नगरपरिषद बीड हद्दीतील निकषात बसणाऱ्या नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते अड्डू जहागीरदार यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात केले आहे. गरिबांचे घराचे स्वप्न साकार व्हावे यासाठी शासनाकडून राबविण्यात येत असलेली प्रधानमंत्री आवास योजनेचा शहरी २.० टप्पा सुरू झाला आहे. यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. यासाठी पात्रतेचे निकष याप्रमाणे असून, भारतामध्ये अर्जदाराचे तसेच कुटूंबामधील इतर सदस्यांच्या नावे पक्के घर नसावे, अर्जदाराने मागील २० वर्षात कोणत्याही शासकीय घरकुल योजनेचा लाभघेतलेला नसावा, अर्जदार हा आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील असावा, अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न मर्यादा ४ लाख ५० हजार कमाल राहील, योजनेअंतर्गत बांधण्यात येणारी घरे कुटूंबातील कर्त्या महिलेच्या किंवा पुरुष व महिला यांच्या संयुक्त नावावर असतील, पती, पत्नी सह अविवाहित मुलांचा समावेश असावा, आधार लिंक असलेले स्वतःचे बँक खाते असावा, एस.सी. एसटी, ओबीसी यांच्यासाठी जातप्रमाणपत्र आवश्यक आहे. या निकषात बसणाऱ्या नागरिकांनी ऑनलाईन पद्धतीने र्हींींिः ििूळी.र्सीं.ळप झच-धचखड२०२ ४/झारू ऊशषर्रीश्रीं.रीं यिथे अर्ज भरावेत असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते अड्डू जहागीरदार यांनी केले आह

## वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे यांच्या माजलगावच्या छत्रपती सहकारी साखर कारखान्यास तांत्रिक कार्यक्षमता पुरस्काराणे गौरविण्यात आले.

### शरदचंद्रजी पवार,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते पुरस्काराचे वितरण

माजलगाव दि.२४ ( प्रतिनिधी) : वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट मांजरी पुणे मार्फत दिला जाणारा २०२३-२४ यावर्षीचा तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार (उत्तर पूर्व विभाग )द्वितीय पारितोषिक छत्रपती सहकारी साखर कारखाना सोनाजीनगर सावरगाव ता. माजलगाव जि. बीड यांना मा.शरदचंद्रजी पवार व मा.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, मा.सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते देण्यात आला.

हा पुरस्कार कारखान्याचे व्हाईस चेअरमन मोहनराव जगताप व कार्यकारी संचालक, शेतकी अधिकारी, सचिव, चीफ इंजिनिअर, चीफ अकाऊंटंट यांनी स्वीकारला. काल पुणे येथे वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट यांच्यावतीने उल्लेखनीय काम गिरी करणा--्या कारखान्यांना



पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. मागील २०२३-२४ या वर्षाच्या तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार छत्रपती कारखान्याच्या कार्यक्षमता मधील उसाचा तंतुमय निर्देशांक ८४.१०%, रिड्यूस्ड मिल एक्स्ट्रॅक्शन ९५.६५ , प्रायमरी एक्स्ट्रक्शन ७३.३०%, बगॅस बचत ११.५१%, साखर तयार करण्यासाठी लागणा-या वाफेचा वापर ४०.६०%, साखर तयार करण्यासाठी लागणा-्या विजेचा वापर २६.४० किलो वॅट प्रति टन ऊस, गाळप क्षमतेचा वापर ११२.४७%, देखभाल दुरुस्तीसाठी एकूण खर्च रुपये ११५ प्रति टन ऊस, गाळपाचे बंद कालावधीचे प्रमाण १.०७% बगॅस मधून व्येय होणा-्या साखरेचे प्रमाण ०.५६% मागील वर्षाच्या तुलनेत साखरेच्या मध्ये घट ०.४८१% असे कार्यक्षमता वैशिष्ट्य कारखान्याने केलेली असून यामुळे छत्रपती कारखान्यास मानचिन्हे व प्रशस्तीपत्र देऊन कारखान्यास गौरविण्यात आले या पुरस्कारासाठी सर्व स्तरातून चेअरमन बाजीराव जगताप,व्हा. चेअरमन मोहनराव जगताप तसेच कारखान्याच्या कर्मचा-यांचे अभिनंदन होत आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com